जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
भ्रमरध्वणी क्र.9819208279

प्रेसनोट दिनांक १८.१०.२०२४

## "भिवंडी परिसरात ६६ ग्रॅम वजनाची एम.डी.(मेफेड्रॉन) क्रिस्टल पावडर जप्त"

दि.१७.१०.२०२४ रोजी रात्रौ २१.४० वा. चे सुमारास, गुन्हे शाखा, घटक–२, भिवंडी येथील पोलीस पथकास मिळालेल्या माहितीवरून, नाशिक कडुन ठाणे कडे जाणाऱ्या सर्विस रोडवर, मानकोली, भिवंडी येथे सापळा रचला असता, इसम नामे उमरान इद्रीस खान, वय २५ वर्षे, रा.कौसा, मुंब्रा याने ६६ ग्रॅम वजनाची एम.डी.(मेफेड्रॉन) क्रिस्टल पावडर हा अंमली पदार्थ, व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकुण २,१७,२५०/– रूपये किमंतीचा अंमली पदार्थ विक्रीकरिता बेकायदेशीररित्या जवळ बाळगला असताना मिळुन आला.

सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून सदर इसमांविरूध्द नारपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.। १६५९/२४ एन.डी.पी.एस.कायदा कलम १९८५ चे कलम ८ (क), २२(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/श्री. धनराज केदार, नेम.गुन्हे शाखा, घटक–२, भिवंडी हे करीत आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर